महाराष्ट्र पोलीस

**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

## प्रेसनोट

दिनांक : २२/०७/२०२३

## मालेगावात २३ लाखांचा अवैध गुटखा जप्त

## नाशिक ग्रामीण पोलीसांचे गुटखा विरोधी 'अभियान - २'

## अवैधरित्या गुटख्याची विक्री/वाहतुक करणा-यांवर ४५ गुन्हे दाखल, ७० लाखांचा गुटखा जप्त

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतूक आदी व्यवसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्हा अंतर्गत गुटख्याची अवैधरित्या वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द गुटखा विरोधी अभियान सुरू केलेले आहे.

सदर अभियानाअंतर्गत दिनांक २२/०७/२०२३ रोजी विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मालेगाव शहरातील मनमाड चौफुली परिसरात चौधरी ट्रान्सपोर्टचे गोडाऊन जवळ छापा टाकून सदर ठिकाणी ट्रक क्रमांक एम.एच.४३.ई.८४७८ मधून किराणा मालाचे खाली दडवलेला सुमारे २३,४८,८००/- रूपये किंमतीचा अवैध गुटखा हस्तगत केला आहे. सदरबाबत पोना नितीन डावखर, पोलीस मुख्यालय नाशिक ग्रामीण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किल्ला पोलीस ठाणेस गुरनं १४०/२०२३ भादवि कलम ३२८,१८८,२७२,२७३,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी नामे इस्माईल खान सत्तार खान, वय ४०, रा. मदनी नगर, मालेगाव यास अटक करण्यात आली आहे.

नाशिक ग्रामीण पोलीसांनी दिनांक ०६/०६/२०२३ पासून गुटखा विरोधी अभियान सुरू केले आहे. या अभियानाअंतर्गत पहिल्या टप्प्यात दि. ०६/०६/२०२३ ते दि. ३०/०६/२०२३ पावेतो नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटख्याविरूध्द व्यापक कारवाई करून १०९ गुन्हे दाखल केले असून १,३६,०६,७८५/- रू.चा गुटखा हस्तगत केला होता. त्यात एकूण (११५) आरोपींना अटक करण्यात आली होती.

जिल्हयातील अवैध गुटखा विक्री व वाहतूकीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी ग्रामीण पोलीसांनी दि. ०६/०७/२०२३ रोजीपासून गुटखा विरोधी 'अभियान-२' सुरू केलेले आहे. सदर अभियानाअंतर्गत दि. ०६/०७/२०२३ ते २१/०७/२०२३ रोजी पावेतो कलम ३२८, १८८, २७२, २७३ भादवि, सह कलम ३०(२)(अ) अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ प्रमाणे एकूण ४२ गुन्हे दाखल केले असून, रूपये ७०,४०,२०७/- चा गुटखा हस्तगत केलेला आहे. यात एकूण (४५) आरोपींना जेरबंद करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण घटकातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी ०८ पथके कार्यरत असून त्यांचेकडून, तसेच स्थानिक पोलीस स्टेशनकडून सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांवर कारवाई करण्यात येत आहे. जिल्हयातील राज्य व राष्ट्रीय महामार्गावर होणारी गुटख्याची वाहतूक तसेच पोलीस ठाणे हद्दीतील पान टप-या, गोडाऊन व इतर आस्थापनांची कसून तपासणी करण्यात येत असून सदरचे अभियान यापुढेही सुरू राहणार आहे.

गुटखा, पान मसाला व इतर प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थांविषयी नागरीकांना काही माहीती असल्यास, नाशिक ग्रामीण पोलीसांच्या हेल्पलाईन क्रमांक **६२६२ २५ ६३६३** या क्रमांकावर सपंर्क साधून नाशिक ग्रामीण पोलीसांनी सुरू केलेल्या अभियानास हातभर लावावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

Scanned by CamScanner